(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[२०२३] ३ एस. सी. आर. ६१८

मेसर्स बी आय एल ए जी इंडस्ट्रीज प्राइवेट लिमिटेड आणि इतर

-विरुद्ध -

केंद्रीय आबकारी आयुक्त, दमन आणि इतर

(दिवाणी अपील क्रमांक (अनेक) ९१९५-९१९६/२०१०)

२२ मार्च, २०२३

[न्यायमूर्ती एस. रवींद्र भट आणि न्यायमूर्ती दीपांकर दत्ता]

केंद्रीय प्रशुल्क कायदा, १९८५ -कलम ४(४)(क)-बी आय एल मध्ये अॅग्रेव्हो एस ए कडे सुरुवातीला ५१% भाग भांडवल होते (जे नंतर ७४ % पर्यंत वाढवण्यात आले) आणि त्यांच्याकडे ५१% पेक्षा जास्त समभाग कायम राहिले- अशा प्रकारे बी आय एल ही अॅग्रेव्हो एस ए ची उपकंपनी बनली- अॅग्रेव्हो एस ए चे अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड मध्ये १००% समभाग होते- म्हणून, बी आय एल आणि अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड हे दोन्ही संबंधित काळात अॅग्रेव्हो एस ए (ज्याचे नाव मार्च 2000 च्या सुमारास अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स एस ए म्हणून बदलण्यात आले) ची उपकंपनी बनले - या प्रकरणात एस्बिओथ्रिनच्या मूल्याबाबत वाद निर्माण झाला- बी आय एल त्याचे उत्पादित माल अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड सोबत विविध मोठ्या निरूपणकर्त्यास विकत होती. बी आय एल कडून खरेदी केलेले एस्बिओथ्रिन अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड द्वारे अंतिम उपभोक्त्याला विकले जात होते. सीमाशुल्क अबकारी आणि सेवाकर अपील न्यायाधिकरण यांचे अनुसार, सदर व्यवहार हे परदेशी कंपनी (अॅग्रेव्हो एस ए, नंतर अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स एस ए म्हणून ओळखले जाणारे) आणि दोन भारतीय उपकंपन्यांचे एक संयुक्त संचालन होते ज्याद्वारे दोघांना फायदा झाला- म्हणून, बी आय एल ने ज्या किंमतीवर अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड ला माल विकला ती "संबंधित व्यक्ती" ला विक्री म्हणून मानली जाईल- तर ज्या किंमतीवर अपिलार्थी बी आय एल ने आपला माल खरेदीकर्त्याला विकला, ती केंद्रीय उत्पादन शुल्क कायदा, १९४४ च्या कलम ४(४)(क) अन्वये संबंधित व्यक्तीशी व्यवहार म्हणून मानले जाईल काय ? - असे मानले : निःसंशयपणे प्रस्तुत प्रकरणात अॅग्रेव्हो एस ए / अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स एस ए) कडे

अ◌ॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड (खरेदीदार) मध्ये संपूर्ण भागधारिता आहे. तो बी आय एल मध्ये देखील भागधारक आहे. नंतरच्याची सर्व उत्पादने अ◌ॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड ला विकली जातात – तथापि हे असे दर्शवित नाही की, बी आय एल ला अ◌ॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेडच्या कारभारात कोणतेही व्यावसायिक हितसंबंध किंवा स्वारस्य आहे, किंवा याउलट, अ◌ॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेडला बी आय एल मध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे असे कोणतेही हितसंबंध आहेत- पक्षकार संबंधित होते की नाही, या संदर्भात महसूलाची तपासणी न्याय्य असू शकते; परंतु असा निष्कर्ष काढता आला नसता की कलम ४(४)(क) अन्वये पूर्वकल्पना दिल्याप्रमाणे योग्य चाचणीचे उपयोजन न करता अशा संबंधांचा अनुमान लावला जाऊ शकतो. याव्यतिरिक्त, महसूलासमक्ष कागदपत्रांच्या स्वरूपात साहित्य होते, जे नफ्याची मर्यादा आणि तुलना करण्यासाठी इतर वस्तुनिष्ठ पुरावे दर्शवितात, जर खरोखरच, विकल्या गेलेल्या वस्तूंची किंमत कमी झाली होती किंवा त्याच किंवा तत्सम वस्तूंच्या बाजार किंमताशी तुलना केली गेली होती- बाजारात त्या वस्तूंच्या किमतीपेक्षा त्या वस्तूंची किंमत कमी होती असे आढळून आले नाही. म्हणून आक्षेपित आदेश कायम ठेवता येत नाही - अपील मंजूर केली जातात.

भारताचे संघ आणि इतर -विरुद्ध - एटिक इंडस्ट्रीज लिमिटेड **[१९८४] ३ एस. सी. आर. ९३०;** भारताचे संघ आणि इतर -विरुद्ध - हिंद लॅम्प लिमिटेड **[१९८९] २ एस. सी. आर. १०२३;** केंद्रीय आबकारी आयुक्त, हैदराबाद -विरुद्ध – डिटर्जंट्स इंडिया लिमिटेड **[२०१५] ६ एस. सी. आर. ८८६;** केंद्रीय आबकारी आयुक्त, चंडीगढ -विरुद्ध – मेसर्स क्वालिटी आइसक्रीम कंपनी [२०१०] **१४ एस. सी. आर. ४०९ - यावर विश्वास दर्शविला.**

केंद्रीय आबकारी आयुक्त, औरंगाबाद -विरुद्ध – गुड इअर साउथ एशिया टायर्स प्राइवेट लिमिटेड आणि इतर **(२०१५) ११ एससीसी ६४६;** सुप्रीम वॉशर्स प्राइवेट लिमिटेड -विरुद्ध –केंद्रीय आबकारी आयुक्त, पुणे **(२००३) १ एस. सी. सी. १४२- संदर्भित.**

<u>**प्रकरणात कायद्याचे संदर्भ**</u>

[१९८४] ३ एस. सी. आर. ९३०	**विश्वास दर्शविला**	**परिच्छेद ८ वर**
[१९८९] २ एस. सी. आर. १०२३	**विश्वास दर्शविला**	**परिच्छेद ८ वर**
[२०१५] ६ एस. सी. आर ८८६	**विश्वास दर्शविला**	**परिच्छेद ८ वर**

[२०१०] १४ एस. सी. आर ४०९	**विश्वास दर्शविला**	**परिच्छेद ८ वर**
(२०१५) ११ एस. सी. सी ६४६	**विश्वास दर्शविला**	**परिच्छेद १४ वर**
(२००३)१ एस. सी. सी. १४२	**विश्वास दर्शविला**	**परिच्छेद १६ वर**

दिवाणी अपीलीय अधिकारक्षेत्र : दिवाणी अपील क्रमांक (अनेक) ९१९५-९१९६/२०१० अपील क्रमांक (अनेक) ई /२८२ आणि २८१/२००७ मध्ये सीमा शुल्क, आबकारी आणि सेवा कर अपीलीय न्यायाधिकरण, पश्चिम विभागीय खंडपीठ, अहमदाबाद च्या दिनांक २३/०४/२०१० रोजीच्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

अपीलकर्त्यांचे अधिवक्ता :- श्री. व्ही. श्रीधरन, वरिष्ठ अधिवक्ता, सुश्री चारण्या लक्ष्मी कुमारन, सुश्री अपेक्षा मेहता, सुश्री नेहा चौधरी, सुश्री फाल्गुनी गुप्ता, श्री. आर. पार्थसारथी.

उत्तरवादीचे अधिवक्ता :- श्री. एन. वेंकटरमण, अतिरिक्त महान्याय अभिकर्ता, श्री. अरिहित प्रसाद, वरिष्ठ अधिवक्ता, श्री. चंद्रशेखर भारती, सुश्री बी. सुनीता राव, सुश्री रुची गौर नरुला, श्री. विवास्वन गौतम, श्री. बी. कृष्ण प्रसाद.

न्यायमूर्ती श्री. एस. रवींद्र भट यांनी दिलेले न्यायनिर्णय :-

१. सीमा शुल्क, आबकारी आणि सेवा कर अपीलीय न्यायाधिकरण [१] (यापुढे 'सी. ई. एस. टी. ए. टी.' किंवा 'न्यायाधिकरण' म्हणून संबोधिले जाईल) च्या आदेशाविरूद्ध निर्देशित केलेल्या या अपीलांमध्ये विचारार्थ उद्भवणारा प्रश्न असा आहे की अपीलकर्ता मेसर्स बी आय एल ए जी इंडस्ट्रीज प्राइवेट लिमिटेड, (यापुढे 'बी आय एल' म्हणून संबोधिले जाईल), वापी यांनी ज्या किंमतीवर आपली उत्पादने खरेदीदाराला विकली, ती किंमत केंद्रीय आबकारी कायदा, १९४४ (यापुढे 'सदर कायदा' म्हणून संबोधिले जाईल) च्या कलम ४(४)(क) अंतर्गत 'संबंधित व्यक्ती' शी केलेला व्यवहार मानले जाईल काय ?

२. १९९२ मध्ये मित्सु इंडस्ट्रीज लिमिटेड (यापुढे 'एम. आय. एल' म्हणून संबोधिले जाईल) म्हणून बी आय एल ची स्थापना करण्यात आली; त्याची स्थापना बिलखिया कुटुंबातील सदस्यांनी केली होती जे त्याचे प्रमुख भागधारक/प्रवर्तक होते. एम. आय. एल हे जंतुनाशके, कीटकनाशके आणि केंद्रीय प्रशुल्क कायदा, १९८५ (यापुढे 'सी ई टी ए' म्हणून संबोधिले जाईल) अंतर्गत वर्गीकृत करण्यायोग्य त्यांचे माध्यमिक द्रव्य निर्मित करीत होते. हे

पायरेथ्रॉइड पदार्थाच्या व्यापक श्रेणीत येतात. सायपरमेथ्रिन आणि अल्फा सायरमेथ्रिन सारख्या इतर पदार्थांव्यतिरिक्त, एम. आय. एल. ने उत्पादनाच्या संपूर्ण श्रेणीसाठी अलेथ्रिन्स, डेल्टामेथ्रिन आणि माध्यमिक द्रव्ये तयार केली. जुलै १९९९ च्या अगोदर, एम. आय. एल. ने एस्बिओथ्रिन आणि एस्बिओल (एलेथ्रिन्सच्या द्रव्य श्रेणीअंतर्गत येणारे) तयार केले नव्हते.

३. दिनांक १६.०२. १९९८ रोजी अॅग्रेव्हो जीएमबी एच आणि एम. आय. एल. ने आशय पत्रावर स्वाक्षरी केली आणि दिनांक २२.११.१९९८ रोजी त्यांनी प्रामुख्याने कृत्रिम पायरेथ्रॉइड पदार्थ आणि त्यांच्या माध्यमिक द्रव्याचे संशोधन, उत्पादन आणि विक्रीसाठी संयुक्त उपक्रम स्थापित करण्याचा त्यांचा हेतू व्यक्त करणाऱ्या “Memo of Understanding (M.O.U)” वर स्वाक्षरी केली. त्यानंतर, दिनांक ०३.०७.१९९९ रोजी एम. आय. एल, अॅग्रेव्हो जीएमबी एच आणि एग्रेव्हो एस. ए यांनी संयुक्त उपक्रम करार (सं.उ.क) केला. हे कृषी रसायने आणि पर्यावरणीय आरोग्य पदार्थांचे संशोधन, विकास आणि निर्मिती करण्याच्या उद्देशाने होते. एम. आय. एल. ने पहिले आपला संपूर्ण गैर-पायरोथायरॉईड व्यवसाय मित्सु पेस्टिसाईड्स लिमिटेड नावाच्या दुसऱ्या कंपनीला हस्तांतरित करण्यास सहमती दर्शवली.

४. संयुक्त उपक्रम कराराच्या समाप्तीच्या तारखेला, एम. आय. एल. चे नाव बदलून मेसर्स बी आय एल ए जी इंडस्ट्रीज लिमिटेड ('बी. आय. एल') असे करण्यात आले. संयुक्त उपक्रमाच्या स्थापनेच्या वेळी, बी. आय. एल. मधील ५१% भाग भांडवल अॅग्रेव्हो एस. ए. कडे होते आणि बी. आय. एल. मधील उर्वरित भाग भांडवल बिलखिया कुटुंबाकडे होते. संयुक्त उपक्रम कराराच्या पुढे, अॅग्रेव्हो एस. ए. आणि एम. आय. एल. ने तंत्रज्ञान आणि रीतसर माहितीसाठीचा अनुज्ञप्ती करार (दिनांक १३.०७.१९९९ रोजी) केला. या अनुज्ञप्ती कराराच्या संदर्भात, अॅग्रेव्हो एस. ए. ने प्रदान केलेल्या विनिर्देशांनुसार, एस्बिओथ्रिन आणि एस्बिओल तयार करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया आणि रीतसर माहिती बी. आय. एल. कडे हस्तांतरित करण्यात आली. या कराराच्या संदर्भात, अॅग्रेव्हो एस. ए. ने त्याच्या विनिर्देशांची पुष्टी करून एलेथ्रिन रेणू (म्हणजे, एस्बिओथ्रिन आणि एस्बिओल पदार्थ) तयार करण्यासाठी बी.आय.एल. ला परवाना देण्यास सहमती दर्शविली होती. अशा प्रकारे, संयुक्त उपक्रमात भागीदार म्हणून, अॅग्रेव्हो एस. ए. ने बी.आय.एल मध्ये भांडवल म्हणून एक निश्चित रक्कम गुंतवली आणि संयुक्त उपक्रम (बी. आय. एल) कंपनीसाठी

एस्बिओथ्रिन आणि एस्बिओल हे पदार्थ तयार करण्यासाठी तांत्रिक ज्ञान देखील आणले. संयुक्त उपक्रम कराराच्या संदर्भात, हे मान्य करण्यात आले की संयुक्त उपक्रम करार चे अनुरूप पक्ष असल्यामुळे, बिलखिया कुटुंबातील तीन सदस्यांना (जे एम. आय. एल. चे संचालक होते) रुपये २५.५१ कोटी बिगर-स्पर्धात्मक शुल्क म्हणून जाणार होते. या बिगर-स्पर्धात्मक शुल्कामुळे बिलखियांना सं. उ. क. लागू झाल्यानंतर, म्हणजे दिनांक ०३.०७.१९९९ पासून, त्याच्याशी स्पर्धा न करण्यास भाग पाडले गेले.

५. बी. आय. एल. आपले उत्पादित पदार्थ रोन पोलेन्क एग्रो केमिकल्स इंडिया लिमिटेड/ अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड सोबत विविध मोठ्या निरूपणकर्त्यास विकत होती. बी. आय. एल. कडून खरेदी केलेले एस्बिओथ्रिन अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड द्वारे अंतिम उपभोक्त्याला विकले जात होते. बी. आय. एल. कडून खरेदी केलेले इतर पदार्थ अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड निरुपणासाठी वापरत होती. बी. आय. एल. ने तयार केलेल्या आणि अॅग्रेव्हो एस. ए. ला निर्यात केलेल्या वस्तूंची किंमत दिनांक ०३.०७.१९९९ च्या पुरवठा करारावर आधारित होती. पुरवठा करारानुसार, बी.आय.एल. ने एप्रिल १९९९ ते मार्च २००३ पर्यंत विविध कालावधीसाठी डेल्टामेथ्रिन पदार्थ एका विशिष्ट किमतीवर विकण्यास सहमती दर्शवली. दिनांक ०३.०७.१९९९ रोजीच्या पुरवठा कराराच्या जोडपत्र ३.१(अ) मधील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे, वास्तविक उत्पादन खर्च आणि नफ्याच्या मर्यादेच्या आधारे किंमत निश्चित केली जाणार होती. त्याचप्रमाणे, बी. आय. एल. ने एलेथ्रिनच्या अंतर्गत येणारे (एस्बिओथ्रिन) अॅग्रेव्हो एस. ए. ला वास्तविक खर्च अधिक लाभ रक्कम म्हणजे १९९९-२००० मध्ये ३५%, २०००-०१ मध्ये ३०% आणि २००२-०३ मध्ये २५% वर विकण्यास सहमती दर्शवली. एस्बिओथ्रिन उत्पादने अॅग्रेव्हो एस. ए. द्वारे भारताबाहेर विकली जात होती. बी. आय. एल. ने भारतात अॅग्रेव्हो (इंडिया) लिमिटेड / अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड ला विक्रीसाठी त्याच पद्धतीने किंमत लावली. परदेशी कंपन्यांच्या समभाग धारण पद्धतींमध्ये नंतर काही बदल झाले; तथापि, ते या प्रकरणाचा निर्णय घेण्याच्या हेतूशी संबंधित नाहीत.

६. या प्रकरणासाठी प्रासंगिक बाब म्हणजे सुरुवातीला अॅग्रेव्हो एस. ए. कडे

बी. आय. एल. मध्ये ५१ टक्के भाग भांडवल होते (जे नंतर ७४ % पर्यंत वाढवण्यात आले) आणि तो ५१ टक्क्यांहून अधिक भाग भांडवल घेणारा राहिला. अशा प्रकारे बी. आय. एल. ही अॅग्रेव्हो एस. ए. ची उपकंपनी बनली. अॅग्रेव्हो एस. ए. कडे अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड मध्ये १००% समभाग होते. म्हणून संबंधित कालावधी दरम्यान, बी. आय. एल. आणि अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड या दोन्ही कंपन्या अॅग्रेव्हो एस. ए. (ज्याचे नाव मार्च २००० च्या सुमारास 'अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स एस. ए.' म्हणून बदलण्यात आले; यापुढे दोन्ही नावे परस्पर बदलून वापरली जातात) च्या उपकंपन्या बनल्या. सदर प्रकरणात एस्बिओथ्रिनच्या मूल्याबाबत वाद निर्माण झाला. १९.०४.२००० - २३.०५.२००१ या कालावधी दरम्यान बी. आय. एल. ने हा माल अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड ला विकला, ज्याने तो अंतिम ग्राहकांना विकला. या कालावधीसाठी, महसूलाने व्यवहाराच्या खर्चाकडे दुर्लक्ष करून, अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड ने ज्या किंमतीवर अंतिम ग्राहकांना माल विकले, त्या किंमतीला निर्धारण मूल्य मानण्याचा प्रस्ताव दिला. त्या कालावधीसाठी शुल्क मागणी रुपये १,६८,८१,६८५/- एवढी होती. रक्कम रुपये २,३९,५४,९१३/- ची मागणी या आधारावर करण्यात आली होती की, अॅग्रेव्हो एस. ए. / अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स एस. ए. ने जाहिरात, प्रसिद्धी, विपणन आणि विक्री खर्च, साठवण, बाह्य हाताळणी, सेवा, हमी इत्यादींसाठी केलेल्या खर्चासाठी तिच्या १००% मालकीच्या उपकंपनीद्वारे रक्कम रुपये १४,९७,१८,२०५/- वसूल केली होती; ते सुमितोमोसोबत केलेल्या कराराच्या अनुषंगाने या आधारावर होते की, अॅग्रेव्हो एस.ए / अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स एस. ए. ही बी. आय. एल. ची सूत्रधारी कंपनी होती आणि म्हणून सुमितोमोने अॅग्रेव्हो एस.ए / अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स एस. ए. ला दिलेली रक्कम अतिरिक्त मोबदला म्हणून ग्राह्य धरली जावी आणि बी. आय. एल. कंपनीला उत्पादित केलेल्या आणि मंजूर केलेल्या मालाच्या मूल्यामध्ये जोडली जावी. सुमितोमोने ज्या किंमतीला अंतिम ग्राहकांना वस्तू विकल्या त्या मूल्यांकन करण्यायोग्य निर्धारण मूल्यासाठी आधार असायला हव्यात आणि बी. आय. एल. ने अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड ला केलेली विक्री ही 'संबंधित व्यक्ती' ला होती या आधारावर, दिनांक ०९.०६.२००१ - २५.०३.२००४ या कालावधी दरम्यान, एस्बिओथ्रिनवर विभेदक शुल्क म्हणून रुपये ५,९५,९७,४३४/- ची

मागणी करण्यात आली होती. मूळ आदेशाविरुद्ध बी. आय. एल. ने सी. ई. एस. टी. ए. टी. कडे अपील केले होते.

७. आक्षेपित आदेशानुसार, CESTAT (सी. ई. एस. टी. ए. टी) ने नोंदवले की, बी. आय. एल. ने एस्बिओथ्रिनच्या उत्पादनाची प्रक्रिया विकसित केली होती जी अंतिम टप्प्यात पोहोचली नव्हती. त्यापूर्वी, एक प्रतिस्पर्धी उदयाला येत असल्याची जाणीव अॅग्रेव्हो एस.ए या परदेशी कंपनीला झाली आणि त्यांनी संयुक्त उपक्रम करार केला. याचा परिणाम असा झाला की बी. आय. एल. ने प्रक्रियेचा विकास थांबविला. त्याने संपूर्ण निर्माण प्रक्रियेची रीतसर माहिती तसेच उत्पादनाच्या निर्मितीचा अधिकार प्राप्त केला आणि नंतर संपूर्ण उत्पादन अॅग्रेव्हो एस.ए. च्या उपकंपनीला विकले. त्या बदल्यात, बी. आय. एल. ला रीतसर तांत्रिक माहिती तसेच अॅग्रेव्हो एस. ए. च्या उपकंपनीने विकसित केलेली विद्यमान विपणन व्यवस्था विनाशुल्क प्राप्त झाली. बी. आय. एल. ला उत्पादनाची विक्री आणि त्यांनी हाती घेतलेल्या उत्पादन उपक्रमांसाठी नफ्याच्या स्तराचे आश्वासनही देण्यात आले होते. इतर उत्पादने विकसित करण्यासाठी त्याला मोकळीक होती. खाजगी कंपनीचे भागधारक बिलखिया कुटुंबातील सदस्यांनाही एकरकमी बिगर स्पर्धात्मक शुल्क मिळाले. त्या बदल्यात, अॅग्रेव्हो एस. ए. आणि भारतीय उपकंपनीने हे सुनिश्चित केले की कोणी स्पर्धक नाही. त्यांनी स्थापन केलेली बाजारपेठ अबाधित होती. याव्यतिरिक्त, त्यांनी उत्पादने ज्या किंमतीला विक्री केली, त्यात सुधारणा करण्याची आवश्यकता नव्हती. कोणत्याही प्रतिस्पर्धा अभावी, विपणन व्यवस्था आणि त्यांनी ओळखलेले ग्राहक अबाधित राहतील. सी. ई. एस. टी. ए. टी. च्या अनुसार, परदेशी कंपनी (अॅग्रेव्हो एस. ए, जी नंतर अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स एस. ए. म्हणून ओळखली गेली) आणि दोन भारतीय उपकंपन्यामधील सदर व्यव्यहार एक संयुक्त संचालन म्हणून होते ज्याद्वारे दोघांना फायदा झाला. त्यामुळे, बी. आय. एल. ने अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड ला ज्या किंमतीवर माल विकला, ती "संबंधित व्यक्तीला" केलेली विक्री मानली जाणार होती.

८. बी. आय. एल. च्या वतीने हजर असलेले ज्येष्ठ अधिवक्ता श्री. व्ही. श्रीधरन यांनी आक्षेपित आदेश चुकीचा असल्याचे सादर केले. त्यांनी पुढे सादर केले की, एखादी संस्था दुसऱ्याशी "संबंधित" आहे की नाही हे ठरवण्यासाठी या न्यायालयाने सातत्याने लागू केलेली चाचणी म्हणजे विक्रेत्याला खरेदीदाराच्या व्यवसायात आणि घडामोडींमध्ये स्वारस्य आहे की

नाही; आणि त्याचप्रमाणे, खरेदीदाराला विक्रेत्याच्या व्यवसायात स्वारस्य आहे की नाही. कलम ४(४)(क) च्या अनुषंगाने, एक पक्ष उपस्थित असला तरी दुसऱ्या पक्षाच्या अनुपस्थितीमुळे कोणतेही संबंध राहणार नाहीत आणि सदर व्यवहार हातभर लांबीवर मानला गेला पाहिजे. विद्वान अधिवक्त्यांनी या न्यायालयाच्या पुढील प्रकरणांतील प्रसिद्ध निर्णयावर विश्वास दर्शविला :- भारताचे संघ आणि इतर -विरुद्ध- एटिक इंडस्ट्रीज लिमिटेड [२], भारताचे संघ आणि इतर -विरुद्ध - हिंद लॅम्प लिमिटेड [३], केंद्रीय आबकारी आयुक्त, हैदराबाद -विरुद्ध – डिटर्जंट्स इंडिया लिमिटेड [४], केंद्रीय आबकारी आयुक्त, चंडीगढ -विरुद्ध – मेसर्स क्वालिटी आइसक्रीम कंपनी[५]. असा युक्तिवाद करण्यात आला की, संयुक्त उपक्रमाच्या प्रयत्नांमुळे उत्पादनातील समन्वय साध्य झाले, ज्यामुळे संयुक्त उपक्रमातील भागीदारांचा विकास आणि संसाधने अनुकूलित झाली; बी. आय. एल. ने (करपात्र) अॅग्रेव्हो एस. ए./ अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स एस. ए. ची आणखी एक उपकंपनी असलेल्या अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड (खरेदीदार) ला विक्री केल्यामुळे बी. आय. एल. ला तिच्या व्यवसायात किंवा व्यवहारात स्वारस्य आहे असे मानले जात नाही; त्याचप्रमाणे, अॅव्हेंटिस क्रॉप सायंस (इंडिया) लिमिटेड ला बी. आय. एल. च्या व्यवसायात कोणताही रस नव्हता.

९. महसूलाच्या वतीने हजर असलेले विद्वान ज्येष्ठ अधिवक्ता श्री. अरिजित प्रसाद यांनी निदर्शनास आणून दिले की, व्यावसायिक संबंध आणि एका संस्थेचे दुसऱ्याच्या व्यवहारातील किंवा व्यवसायातील हितसंबंध अडचणीत आणता येत नाही. संयुक्त उपक्रम आणि बी. आय. एल, ज्यामध्ये विदेशी कंपनी अॅग्रेव्हो एस. ए. / अॅव्हेंटिस क्रॉप सायंस एस. ए. ही एक प्रमुख भागधारक आहे, याचे घडण असे सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने करण्यात आले होते की, अॅग्रेव्हो एस. ए /अॅव्हेंटिस क्रॉप सायंस एस. ए. ची १००% पर्यंत मालकी असलेल्या त्याच्या उपकंपनी अॅव्हेंटिस क्रॉप सायंस (इंडिया) लिमिटेड च्या माध्यमातून, सदर निर्मित उत्पादने त्याच्या परदेशी बाजारपेठेत पोहोचतील. यामुळे खरेदीदाराच्या व्यवसायात एकमेकांमध्ये वास्तविक आणि थेट स्वारस्य स्पष्टपणे दिसून आले. त्यामुळे सी. ई. एस. टी. ए. टी. च्या आदेशात हस्तक्षेप केला जाऊ नये, असे त्यांनी सादर केले.

विश्लेषण आणि तर्क

१०. सदर कायद्याच्या कलम ४ चे संबंधित भाग पुढीलप्रमाणे आहे :-

“ ४. आबकारी शुल्क आकारण्याच्या उद्देशाने आबकारी शुल्क आकारण्यायोग्य वस्तूंचे मूल्यांकन (१) या अधिनियमान्वये, कोणत्याही आबकारी शुल्क आकारण्यायोग्य वस्तूवर, त्यांच्या मूल्याच्या संदर्भात आबकारी शुल्क आकारले जात असेल, तर प्रत्येकवेळी वस्तू काढून टाकल्यावर, असे मूल्य -(अ) अशा प्रकरणात जेथे करदात्याने वस्तू काढून टाकण्याच्या वेळी आणि ठिकाणी वितरणासाठी वस्तू विकली असेल, करदाता आणि खरेदीदार यांचा संबंध नसेल आणि विक्रीसाठी किंमत हा एकमेव मोबदला असेल, तर ते व्यवहाराचे मूल्य असेल;

(ब) वस्तू विकली गेली नाही अशा प्रकरणासह इतर कोणत्याही प्रकरणात, विहित केलेल्या पद्धतीने निर्धारित केलेले मूल्य असेल.

स्पष्टीकरण :- याद्वारे शंका दूर करण्यासाठी असे घोषित करण्यात येते की, करदात्याने विकलेल्या आबकारी शुल्क आकारण्यायोग्य वस्तूंची किंमत-सह-शुल्क ही त्याला विकल्या गेलेल्या वस्तूंसाठी प्रत्यक्षात दिलेली किंमत आणि अशा वस्तूंच्या विक्रीच्या संदर्भात खरेदीदाराकडून करपात्र व्यक्तीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे येणाऱ्या अतिरिक्त मोबदल्याचे पैशाचे मूल्य, जर असेल तर, आणि विक्री कर आणि इतर कर, जर असतील तर, ते वगळता अशा किंमती-सह-शुल्कामध्ये अशा वस्तूंवर देय शुल्क समाविष्ट असल्याचे मानले जाईल.

(२) कोणत्याही आबकारी शुल्क आकारण्यायोग्य वस्तूच्या संबंधात, काढून टाकण्याच्या ठिकाणी वितरणासाठी त्याची किंमत ज्ञात नसेल आणि त्याचे मूल्य, काढून टाकण्याच्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी वितरणासाठीच्या किंमतीच्या संदर्भात निर्धारित केले गेले असेल, तर काढून टाकण्याच्या ठिकाणाहून वितरणस्थळी नेण्याचा वाहतूक खर्च अशा किंमतीतून वगळला जाईल.

(३) ज्या वस्तूंसाठी कलम ३ च्या उपकलम (२) अन्वये प्रशुल्क निश्चित करण्यात आले आहे, अशा कोणत्याही आबकारी शुल्क आकारण्यायोग्य वस्तूंच्या संदर्भात सदर कलमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

(४) सदर कलमाच्या व्याप्तीची मर्यादा :-

(अ) “करपात्र व्यक्ती" म्हणजे या कायद्यांतर्गत आबकारी शुल्क भरण्यास जबाबदार असलेली व्यक्ती आणि त्यात त्याचा प्रतिनिधी समाविष्ट आहे;

******** ********

(क) "संबंधित व्यक्ती" म्हणजे अशी व्यक्ती जी करदात्याशी इतकी संलग्न आहे की, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे एकमेकांच्या व्यवसायात त्यांचे हितसंबंध आहेत आणि त्यात सूत्रधार कंपनी, उप कंपनी, करपात्र व्यक्तीचे नातेवाईक आणि वितरक आणि करपात्र व्यक्तीचा कोणताही उप-वितरक आणि अशा वितरकाचा कोणताही उप-वितरक यांचा समावेश आहे".

११. एटिक इंडस्ट्रीज (उपरोल्लेखित) मध्ये, या न्यायालयाने "संबंधित व्यक्ती" या अभिव्यक्तीचे परीक्षण केले :

"व्याख्येच्या पहिल्या भागात जे आवश्यक आहे ते म्हणजे ज्या व्यक्तीला संबंधित व्यक्ती म्हणून घोषित करण्याचा प्रयत्न केला जातो" ती व्यक्ती अशी व्यक्ती असली पाहिजे जी करपात्र व्यक्तीशी इतकी संबंधित आहे की त्यांना एकमेकांच्या व्यवसायात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे स्वारस्य आहे. तथाकथित संबंधित व्यक्तीच्या व्यवसायात करपात्र व्यक्तीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे स्वारस्य आहे किंवा तथाकथित संबंधित व्यक्तीला करपात्र व्यक्तीच्या व्यवसायात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे स्वारस्य आहे हे पुरेसे नाही. या व्याख्येच्या पहिल्या भागाची अशी प्रयोज्यता असणे आवश्यक आहे की, करपात्र व्यक्ती आणि तथाकथित संबंधित व्यक्तीला एकमेकांच्या व्यवसायात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे स्वारस्य असणे आवश्यक आहे. त्यांच्यापैकी प्रत्येकाचा दुसऱ्याच्या व्यवसायात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध असणे आवश्यक आहे. प्रत्येकाचे दुसऱ्याच्या व्यवसायात असणाऱ्या हितसंबंधांची समानता आणि प्रमाण भिन्न असू शकते; एकाचे दुसऱ्याच्या व्यवसायातील हित थेट असू शकते, तर दुसऱ्याचे पहिल्याच्या व्यवसायातील हित अप्रत्यक्ष असू शकते. जोपर्यंत प्रत्येकाला दुसऱ्याच्या व्यवसायात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे काही स्वारस्य आहे, तोपर्यंत काही फरक पडणार नाही. आता प्रस्तुत प्रकरणात, अतुल प्रॉडक्ट्स लिमिटेडला निःसंशयपणे करपात्र व्यक्तीच्या व्यवसायात स्वारस्य आहे, कारण अतुल प्रॉडक्ट्स लिमिटेडकडे करपात्र व्यक्तीच्या भाग भांडवलीचा ५० टक्के हिस्सा आहे आणि त्याला करपात्र व्यक्तिद्वारे चालविण्यात आलेल्या व्यवसायात 'भागधारक' म्हणून स्वारस्य आहे. परंतु अतुल प्रॉडक्ट्स

लिमिटेडच्या व्यवसायात करपात्र व्यक्तीला काही स्वारस्य आहे असे म्हणणे शक्य नाही. तिथे असे दोन दृष्टीकोण आहेत ज्यातून करपात्र व्यक्ती आणि अतुल प्रॉडक्ट्स लिमिटेड यांच्यातील संबंधांचा विचार केला जाऊ शकतो. प्रथम हे लक्षात घेतले जाऊ शकते की, अतुल प्रॉडक्ट्स लिमिटेड हा करपात्र व्यक्तीच्या भाग भांडवलीचा ५० टक्के मर्यादेपर्यंत भागधारक आहे. परंतु अशा भागधारकाचे समभागधारकत्व ५० टक्के असले तरी, एखाद्या मर्यादित कंपनीचे त्याच्या भागधारकांपैकी एकाने चालवलेल्या व्यवसायात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध आहेत असे कसे म्हणता येईल हे आम्हाला समजत नाही. दुसरे म्हणजे, अतुल प्रॉडक्ट्स लिमिटेड हे करपात्र व्यक्तीने उत्पादित केलेल्या रंगद्रव्यांचे घाऊक खरेदीदार आहे, परंतु तरीही, त्यांच्यामधील व्यवहार मुद्दल ते मुद्दल असल्याने, त्या परिस्थितीमुळे करपात्र व्यक्तीला अतुल प्रॉडक्ट्स लिमिटेडच्या व्यवसायात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणतेही स्वारस्य आहे असे कसे म्हणता येईल हे समजून घेणे कठीण आहे. 'अतुल प्रॉडक्ट्स लिमिटेड' करपात्र व्यक्तिकडून मुद्दल ते मुद्दल या आधारावर घाऊक प्रमाणात रंग खरेदी करते आणि नंतर अशा रंगांची बाजारात विक्री करते. अतुल प्रॉडक्ट्स लिमिटेड करपात्र व्यक्तिकडून खरेदी केलेल्या रंगांची विक्री करते की नाही, याची पर्वा करपात्र व्यक्ति करत नाही किंवा अतुल प्रॉडक्ट्स लिमिटेड अशा रंगांची विक्री तोट्यात करते की नाही याचीही पर्वा करत नाही. असे म्हणणे अशक्य आहे की घाऊक विक्रेत्याच्या व्यवसायात करपात्र व्यक्तीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वारस्य आहे, जो त्यातून मुद्दल ते मुद्दल आधारावर रंगद्रव्ये खरेदी करतो. तीच स्थिती क्रेसेंट डाईज अँड केमिकल्स लिमिटेडच्या संदर्भात पाहायला मिळते. क्रेसेंट डाईज अँड केमिकल्स लिमिटेडच्या संदर्भात कदाचित अतुल प्रॉडक्ट्स लिमिटेडच्या तुलनेत स्थिती अधिक मजबूत आहे. क्रेसेंट डायस अँड केमिकल्स लिमिटेड हा करपात्र व्यक्तीचा भागधारकदेखील नाही आणि त्यामुळे करपात्र   व्यक्तीच्या व्यवसायात त्याला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे स्वारस्य नाही".

१२. त्यानंतरच्या 'हिंद लॅम्प लिमिटेड' (वर नमूद केलेले) मध्ये दिलेल्या निर्णयात हाच तत्त्व प्रतिध्वनित होतो:-

" करपात्र व्यक्तीला तथाकथित संबंधित व्यक्तीच्या व्यवसायात स्वारस्य आहे किंवा अप्रत्यक्षपणे स्वारस्य आहे हे पुरेसे नाही किंवा तथाकथित संबंधित व्यक्तीला करपात्र व्यक्तीच्या व्यवसायात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे स्वारस्य आहे हे पुरेसे नाही. व्याख्येच्या पहिल्या भागाची प्रयोज्यता असण्यासाठी, करपात्र व्यक्ती आणि तथाकथित संबंधित व्यक्तीला एकमेकांच्या व्यवसायात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे स्वारस्य असणे आवश्यक आहे. त्यांच्यापैकी प्रत्येकाचा दुसऱ्याच्या व्यवसायात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध असणे आवश्यक आहे. प्रत्येकाचे दुसऱ्याच्या व्यवसायात असणाऱ्या हितसंबंधांची गुणवत्ता आणि प्रमाण भिन्न असू शकते; एकाचे दुसऱ्याच्या व्यवसायात थेट हित असू शकते तर दुसऱ्याचे पहिल्याच्या व्यवसायात अप्रत्यक्ष हित असू शकते. तथ्यांचे विश्लेषण केल्यानंतर, हे न्यायालय या निष्कर्षाप्रत पोहोचले की कोणताही संबंध नव्हता".

१३. डिटर्जंट इंडिया लिमिटेड (उपरोल्लेखित) मध्ये, या न्यायालयाने कलम ४(४)(क) मधील व्याख्येच्या दोन्ही भागांचे परीक्षण केले आणि पुढीप्रमाणे निरीक्षण केले :-

"कलम ४ (४)(क) दोन भागांमध्ये आहे. पहिल्या भागात विभागाने वास्तविक चाचणी लागू करणे आवश्यक आहे, तर दुसऱ्या भागात वैध चाचणी लागू करणे आवश्यक आहे. कंपनी कायदा, १९५६ मध्ये 'संबंधित' ची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे :-

************* *************

'संबंधित' या व्याख्येचे वाचन केल्यास असे दिसून येईल की 'संबंधित' ही अशी व्यक्ती असण्याची गरज नाही जी करपात्र व्यक्तीशी इतकी संबंधित आहे की त्यांना एकमेकांच्या व्यवसायात परस्पर स्वारस्य आहे. जर तसे असेल, तर दुसऱ्या भागात 'संबंधित' ही अभिव्यक्ती निरुपयोगी असेल, कारण पहिल्या भागात 'व्यक्ती' मध्ये नातेवाईक समाविष्ट केला जाईल. अशा प्रकारे, 'नातेवाईक' देखील 'व्यक्ती' असतील जे करदात्याशी इतके संबंधित आहेत की त्यांना एकमेकांच्या व्यवसायात परस्पर स्वारस्य आहे. विधिमंडळाने डी वैध चाचणी लागू करून 'संबंधित व्यक्तींचा' अर्थ वाढवला आहे, ज्यात संबंधित व्यक्तीशिवाय स्वयमेव नातेवाईकांची संपूर्ण यादी समाविष्ट केली आहे. त्याचप्रमाणे,

सूत्रधारक कंपन्या आणि उप कंपन्या, सूत्रधारक कंपनीने उपकंपनीवर केलेल्या नियंत्रणाच्या आधारावर, वैध चाचणीद्वारे अशाच प्रकारे समाविष्ट केल्या जातात.

आम्ही असे सूचित केले आहे की, करपात्र व्यक्तीने युक्तिवाद केला की शॉ वॉलेस आणि कंपनीने त्याच/तत्सम उत्पादनांसाठी दिलेली किंमत, जी त्याला असंबंधित संस्थांनी विकली होती, ती शॉ वॉलेसने डिटर्जंट इंडिया लिमिटेडला दिलेल्या किंमतीपेक्षाही कमी होती. या प्रकरणात, हे स्पष्ट आहे की या तथ्यांवर शॉ वॉलेस आणि डिटर्जंट इंडिया लिमिटेड यांच्यात किंमत कमी करण्यासाठी कोणतीही "व्यवस्था" नाही जी अन्यथा हाथभर लांबीवर आहे. जरी ही वस्तुस्थिती आयुक्तांसमोर स्पष्टपणे मांडली गेली असली तरी वर नमूद केल्याप्रमाणे, आयुक्तांच्या आदेशात या वस्तुस्थितीवर आधारित कोणताही निष्कर्ष नाही."

१४. केंद्रीय आबकारी शुल्क आयुक्त, 'औरंगाबाद वि. गुड इअर साउथ एशिया टायर्स प्राइवेट लिमिटेड आणि इतर' च्या प्रकरणामधील निर्णय हा बोधप्रद आहे. गुड इअर आणि CEAT (दोघांचाही त्यात समान वाटा होता) शी संयुक्त उपक्रम करार असलेल्या करपात्र व्यक्तीने गुडइअर आणि CEAT या दोन्हींकडून भरीव रक्कम उधार घेतली होती. नंतर CEAT ने आपली संपूर्ण भागधारिता गुड इयर कडे हस्तांतरित केली. महसूल विभागाने असे अभिकथन केले की, करपात्र व्यक्ती आणि गुड इअर हे 'संबंधित' व्यक्ती होते, जे या न्यायालयाने अमान्य केले होते :

> “७.'एकमेकांच्या व्यवसायात' ही अभिव्यक्ती स्पष्टपणे सूचित करते की, संबंधित व्यक्ती मानण्यासाठी दोन्ही व्यक्तींचे हितसंबंध परस्पर असणे म्हणजे एकमेकांशी असणे आवश्यक आहे.
>
> ८. न्यायिक सदस्याच्या आदेशावरून आम्हाला असे आढळून आले की, केवळ दोन कंपन्यांनी करपात्र कंपनीला ८५.६६ कोटीचे कर्ज दिले होते, जे करपात्र व्यक्ती आणि खरेदीदार यांच्यातील संबंध प्रस्थापित करण्यासाठी पुरेसे आधार म्हणून मानले गेले. हे केवळ एकमार्गी रहदारी दर्शविते, याउलट द्विमार्गी रहदारीची आवश्यकता आहे. आमच्या मते, दुसऱ्या सदस्याने योग्यरित्या असे मत मांडले की, हा परस्पर हितसंबंध दर्शविणारा घटक असू शकत नाही.....”

१५. क्वॉलिटी आइस्क्रीम (उपरोल्लेखित) च्या प्रकरणामध्ये मध्ये पुन्हा एकदा, न्यायालयाने करपात्र व्यक्ती आणि खरेदीदार या दोन संस्थांच्या व्यावसायिक हितसंबंधांचे परस्परावलंबन आणि परस्परसंबंध अधोरेखित केले :-

> "वर नमूद केलेल्या निर्णयांचे विश्लेषण केल्यावर असे दिसते की, सहभागी असलेल्या प्रत्येक पक्षांना, मग ते प्रत्यक्ष असो किंवा अप्रत्यक्ष, एकमेकांच्या व्यवसायात स्वारस्य असले पाहिजे. मेसर्स क्वॉलिटी आइस्क्रीम आणि बी. बी. एल. आय. एल/ एच. एल. एल. यांच्यामधील कराराचे संबंधित खंड पुढीलप्रमाणे आहे, ज्याच्या आधारे आणि वर नमूद केलेली तत्त्वे लागू करून, ते 'संबंधित व्यक्ती' आहेत की नाही याबद्दल विचार करणे आवश्यक आहे.
>
> ************* *************
>
> पक्ष 'संबंधित व्यक्ती' आहेत की नाही याचा विचार करण्यासाठी, वितरक असो किंवा उत्पादक, यांच्या संबंधांच्या पलीकडे निश्चित परस्परावलंबन आणि परस्परसंवाद हे महत्त्वाचे आहे. वस्तुस्थितीवरून हे लक्षात येते की, मेसर्स क्वॉलिटी आइस्क्रीम आणि बी. बी. एल. आय. एल./एच. एल. एल. यांच्यामध्ये एकतर्फी संबंध आहेत आणि वस्तुस्थिती असे सुचवत नाही की, त्यांच्यापैकी प्रत्येकाला एकमेकांच्या व्यवसायात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वारस्य आहे."

१६. दुसरीकडे, जर एखाद्याने आंतर-संबंध म्हणजे काय याचा विचार केला तर 'सुप्रीम वॉशर्स प्राइवेट लिमिटेड -विरुद्ध –केंद्रीय आबकारी आयुक्त, पुणे' [७] च्या प्रकरणामधील निर्णय हा बोधप्रद आहे. करपात्र व्यक्तिकर्ता आणि खरेदीदार कच्च्या मालाच्या सामायिक खरेदीत गुंतलेले होते; त्यांच्याकडे साठाबाबतचा लेखा सामायिक होता आणि ते नियोजन आणि उत्पादन प्रक्रियेसाठी परस्परावलंबित होते. या न्यायालयाने असे मत व्यक्त केले आहे की, कच्च्या मालाचा आणि अर्ध-तयार वस्तूंचा सामायिक साठा, तीन घटकांमध्ये यंत्रसामग्रीचा सामायिक वापर, सामायिक विपणन व्यवस्था आणि तीन घटकांमध्ये वित्तपुरवठ्याचा मुक्त प्रवाह यामुळे करदात्यांचे परस्पर संबंध आणि तिन्ही घटकांचे एकमेकांवर अवलंबित्व एकत्रितपणे स्थापित होते.

१७. प्रस्तुत प्रकरणात, निःसंशयपणे अॅग्रेव्हो एस. ए./ अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स एस. ए. कडे अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड (खरेदीदार) मधील संपूर्ण भागभांडवल

आहे. ती बी. आय. एल. मध्येही भागधारक आहे. नंतरच्याची सर्व उत्पादने अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड ला विकली जातात. तथापि हे असे दर्शवत नाही की,अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड च्या कारभारात बी. आय. एल. चे कोणतेही व्यावसायिक हितसंबंध किंवा स्वारस्य आहे, किंवा याउलट, अॅव्हेंटिस क्रॉप सायन्स (इंडिया) लिमिटेड चे बी. आय. एल. मध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे असे कोणतेही हितसंबंध आहेत. पक्षकार संबंधित होते की नाही, या संदर्भात महसूलाची तपासणी न्याय्य असू शकते; परंतु असा निष्कर्ष काढता आला नसता की कलम ४(४)(क) अन्वये पूर्वकल्पना दिल्याप्रमाणे योग्य चाचणीचे उपयोजन न करता अशा संबंधांचा अनुमान लावला जाऊ शकतो. याव्यतिरिक्त, महसूलासमक्ष कागदपत्रांच्या स्वरूपात साहित्य होते, जे नफ्याची मर्यादा आणि तुलना करण्यासाठी इतर वस्तुनिष्ठ पुरावे दर्शवितात, जर खरोखरच, विकल्या गेलेल्या वस्तूंची किंमत कमी झाली होती किंवा त्याच किंवा तत्सम वस्तूंच्या बाजार किंमताशी तुलना केली गेली होती. बाजारात त्या वस्तूंच्या किमतीपेक्षा त्या वस्तूंची किंमत कमी होती असे आढळून आले नाही.

१८. वरील चर्चा लक्षात घेता, असा निष्कर्ष काढला पाहिजे की, करपात्र व्यक्तीला संबंधित व्यक्ती मानून ज्या मूल्यावर माल विकला गेला, त्या मूल्याला नाकारण्याचा महसूलाचा निर्णय चुकीचा होता. याच कारणांमुळे असे मत व्यक्त करण्यात येते की, आक्षेपित आदेश कायम ठेवला जाऊ शकत नाही; तो बाजूला ठेवला जातो. परिस्थितीचे अधीन राहून, खर्चाबाबत कोणताही आदेश न देता, सदर अपील मंजूर केली जातात.

अंकित ज्ञान | अपील (अनेक) मंजूर.

(सहाय्यक:- महेंद्र यादव, एल. सी. आर. ए.)

<u>न्यायनिर्णयांची यादी</u>

१. दिनांक २३.०४.२०१० रोजी आदेश क्र. ३३०-३३७/डब्ल्यू झेड डी / ए एच बी /२०२१०

२. [१९८३] ३ एससीआर ९३०

३. [१९८९] २ एससीआर १०२३

४. [२०१५] ६ एससीआर ८८६

५. [२०१०] १४ एससीआर ४०९

६. (२०१५) ११ एससीसी ६४६

७. (२००३) १ एस. सी. सी. १४२

<u>**अस्वीकरण**</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करिता वैध मानला जाईल.

X – X – X – X